# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा. क्र. तंशिविकापु/विवि/परीक्षाकेंद्र/२०१९-२०/ 1670 दिनांक :- 12 APR 2019

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य
एमबीए व पदवी अभियांत्रिकी संस्था,
(पुणे महानगरपालीका व पिंपरी चिचवड महानगरपालीका हद्दीतील संस्था)

विषय : महाराष्ट्र वन सेवा पुर्व परीक्षा-२०१९
परीक्षेच्या आयोजनाकरीता महाविद्यालय उपलब्ध करुन देण्याबाबत..

संदर्भ : १. महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई, यांचे कडील पत्र क्र एमएफसी-३५१९ सीआर-२१/२०१९ / तीन दिनांक २५/०३/२०१९.
२. मा. जिल्हाधिकारी कार्यालय पुणे महसूल शाखा, विधानभवन, पुणे-१ क्र पमड/परीक्षा/२६ मे १९दिनांक १/४/२०१९

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की दिनांक २६/०५/२०१९ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई यांनी पुणे केंद्रावर वन सेवा पुर्व परीक्षा-२०१९ आयोजित केलेली आहे.

सदर परीक्षा रविवार दिनांक २६/०५/२०१९ रोजी सकाळ सत्रात होणार आहे. आयोगाची बैठक व्यवस्था ही एका वगार्त २४ या प्रमाणे असते, प्रत्येक वर्गात एका बेंच वर एक याप्रमाणे कमीत कमी २४ या प्रमाणे बैठक व्यवस्था करावी लागते.

आपण महाराष्ट्र लोकसेवा आयोग वन सेवा पुर्व परीक्षा-२०१९ परीक्षेकरीता आपल्या संस्थेतील बैठक व्यवस्थेबाबतची सद्यस्थिती काय आहे. या बाबत परस्पर मा.जिल्हाधिकारी कार्यालय पुणे महसूल शाखा, विधानभवन पुणे १ यांना ईमेल आयडी mahsulpune१@gmail.com या ईमेलवर व दूरध्वनी क्र 020-26114804 महाविद्यालय उपलब्ध व बैठक व्यवस्था बाबत त्वरीत कळविण्यात यावे.

सोबत :- संदर्भीय पत्राची छायाप्रत.

आपला विश्वासु,

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :-मा.जिल्हाधिकारी कार्यालय पुणे महसूल शाखा,विधानभवन,पुणे-१

अतितात्काळ/ परीक्षा

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
महसूल शाखा, विधानभवन, पुणे १
क्र. पमड/ परीक्षा/ २६ मे /१९
पुणे -१ दिनांक १/४/२०१९
फोन नं. २०-२६११४८०४
ईमेल आयडी - mahsulpune१@gmail.com

प्रति,
संचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे,
४१२ ई, शिवाजीनगर, पुणे ४११०१६

**विषयः- महाराष्ट्र वन सेवा पुर्व परीक्षा -२०१९**
**परीक्षेच्या आयोजनाकरीता शाळा / महाविद्यालय उपलब्ध करून देण्याबाबत.**

**संदर्भः -महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई, यांचे कडील पत्र क्र. एमएफसी- ३५१९/ सीआर- २१/२०१९ / तीन, दिनांक २९ मार्च २०१९**

२/- **उपरोक्त विषयी** महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई यांचे मार्फत दिनांक २६/५/२०१९ रोजी पुणे केंद्रावर महाराष्ट्र वन सेवा **पुर्व परीक्षा -२०१९** आयोजीत केली आहे. सदरची परीक्षा ही सकाळ सत्रात होणार आहे.

सदर परीक्षेकरीता जिल्हाधिका-यांकडून महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत मागणी केली जाते व बहुतांशी महाविद्यालयांकडुन नकार दिला जातो. आयोगामार्फत दिनांक १७/२/२०१९ व २४/३/२०१९ रोजी झालेल्या परीक्षेकरीता अभियांत्रिकी/ तंत्रशिक्षाण/ औषधनिर्माण/ व्यवस्थापन महाविद्यालये उपलब्ध झालेले नसल्याने आयोगाने या कार्यालयास सदरची महाविद्यालयांनी या कार्यालयास लेखी पत्राव्दारे नकार दर्शविलेला असल्यास त्याची माहिती सादर करणे बाबत कळविलेले होते.

तरी सदर परीक्षेकरीता महाविद्यालये उपलब्ध करून देणे बाबत सर्व महाविद्यालयांना ईमेल व्दारे कळविलेले आहे.

तसेच आयोगाची बैठक व्यवस्था ही एका वर्गात २४ या प्रमाणे असते. प्रत्येक वर्गात एका बेंच वर एक याप्रमाणे कमीतकमी २४ या प्रमाणे बैठक व्यवस्था करावी लागते. याबाबत आपले मार्फत सुध्दा प्रस्तुत महाविद्यालयांना कळविण्यात यावे की, प्रस्तुत परीक्षेकरीता क्षमता कळवितांना एका बेंचवर एक याप्रमाणे कमीतकमी २४ याप्रमाणे बैठक व्यवस्था करावी लागते. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयास माहिती देणे बाबत संबंधितास आपले मार्फत सुध्दा कळविण्यात यावे, हि विनंती.

आपला विश्वासु

( विवेक जाधव )
सहा. परीक्षा नियंत्रक तथा
तहसिलदार महसूल
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
02 APR 2019
आवक क्र. 3579

D:\mpsc file.doc

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२, फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्र.एमएफपी-३५१९/सीआर-२१/२०१९/तीन दिनांक :- २९ मार्च, २०१९

प्रति,
जिल्हाधिकारी, पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे-४११००१.

विषय :- महाराष्ट्र वन सेवा पूर्व परीक्षा-२०१९.
परीक्षेच्या आयोजनाकरिता शाळा/महाविद्यालय उपलब्ध करुन देण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मुंबईसह महाराष्ट्रातील औरंगाबाद, नागपूर व पुणे जिल्हाकेंद्रावर आयोजित विषयांकित परीक्षेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे :-

| परीक्षेचा दिवस व दिनांक | वेळ | विषय | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप | संभाव्य उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|---|
| रविवार, दिनांक २६ मे, २०१९ | सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० | मराठी, इंग्रजी, सामान्य अध्ययन | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | ३५००० |

२. संभाव्य उमेदवारांची संख्या लक्षात घेऊन **शनिवार, दिनांक २५ मे, २०१९** रोजी बैठकव्यवस्था करण्याच्या कामाकरिता तसेच **रविवार, दिनांक २६ मे, २०१९** रोजी सकाळी ८.०० ते दुपारी १.०० पर्यंत प्रत्यक्ष परीक्षा घेण्यासाठी कृपया शाळा/महाविद्यालयांची नावे उपलब्ध करुन द्यावीत.

३. उमेदवारांच्या संभाव्य संख्येमध्ये बदल झाल्यास संख्येमधील बदलाबाबतची माहिती त्वरित कळविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

४. आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मलोआ-१०१२/प्र.क्र.९५/१२/आठ दिनांक ११ मे, २०१२ तसेच शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण- १११४/(प्र. क्र. ९/१५)/समन्वय, दिनांक २८ जानेवारी, २०१५ व शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग,क्रमांक संकीर्ण-१११७/प्र.क्र.३८५/एसएम-१ दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशातील तरतुदीनुसार शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कृपया आवश्यक ती व्यवस्था करण्यात यावी.

५. परीक्षेसाठी शाळा/महाविद्यालयांची निवड करताना मुख्यालयाच्या **३०** किमी त्रिजेच्या परिसरातील सुयोग्य शाळा/महाविद्यालयांची निवड करण्यात यावी. तसेच शक्यतो अभियांत्रिकी/तंत्रनिकेतन/औषधनिर्माणशास्त्र/पारंपरिक शिक्षण पध्दतीच्या महाविद्यालयांना प्राथम्य देण्यात यावे.

६. परीक्षेकरीता शाळा/ महाविद्यालये उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण झाल्यास अथवा परीक्षा व्यवस्थित व सुरळितपणे पार पाडण्यासाठी शाळा/महाविद्यालये सहकार्य करीत नसल्यास संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार शाळा/महाविद्यालयांचे अधिग्रहण (Requisition) करण्यात यावे. तसेच सदर कृती ही शासकिय कामकाजामधील अडथळा समजण्यात यावी.

७. परीक्षेसाठी शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून देण्यास एखाद्या संस्थेकडून अडचणी निर्माण केल्या जात असल्यास संबंधित सह/उपसंचालक/शिक्षणाधिकारी यांच्याकडे त्वरित संपर्क साधून त्यांचेही सहकार्य घेण्यात यावे.

८. अडचणी निर्माण करणाऱ्या अथवा सहकार्य न करणाऱ्या शाळा/महाविद्यालयांची नांवे कृपया आयोगास कळविण्यात यावीत.

९. परीक्षेच्या कामासाठी शाळा/महाविद्यालयाकडे विचारणा करताना प्रति उमेदवार रूपये ८/- या दराने (सर्व करासहित) परीक्षेच्या दिवसासाठी सेवाशुल्क अदा करण्यात येईल; असेही सुस्पष्टपणे संबंधितांना कळविण्यात यावे.

१०. परीक्षांकरिता शाळा/महाविद्यालयांची नावे कळविताना संबंधित शाळा/महाविद्यालयाचा संपूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी क्रमांक कृपया आवर्जुन नमुद करावा.

११. शाळा/महाविद्यालयाची परीक्षेसाठी निवड करताना संबंधित शाळा/महाविद्यालयामध्ये प्रवेश द्यावयाच्या उमेदवारांच्या प्रत्यक्ष क्षमतेविषयीची (Capacity) माहिती कृपया उपलब्ध करून देण्यात यावी. कोणत्या उपकेंद्रावर किती उमेदवारांना प्रवेश द्यावयाचा याविषयीचा निर्णय आयोगाच्या कार्यालयाकडून घेण्यात येईल.

१२. प्रस्तुत परीक्षेकरिता आपल्या जिल्हाकेंद्रावर काही दिव्यांग उमेदवारांना प्रवेश देण्याची शक्यता असून त्यांच्याकरिता मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्वतंत्र व्यवस्था करावी लागणार आहे. आयोगाच्या प्रचलित धोरणानुसार दिव्यांग उमेदवारांना संबंधित जिल्हाकेंद्रावरील शेवटच्या उपकेंद्रावर प्रवेश देण्यात येतो. सदर वस्तुस्थिती लक्षात घेऊन दिव्यांग उमेदवारांकरिता कोणते परीक्षा उपकेंद्र निश्चित करण्यात यावे, याविषयीही कृपया कळवावे.

१३. सोबतच्या विवरणपत्रान्वये (विवरणपत्र-१) इंग्रजीत आवश्यक ती माहिती **दिनांक ५ एप्रिल,२०१८** पर्यंत ईमेलव्दारे कृपया पाठवावी.

आपला विश्वासू,

( रा. धो. माशेरे )
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग